पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
माजसं/२/कावि/७१९/२०१८
दि.२६/११/२०१८

# परिपत्रक

## विषय- जाहिरात रोटेशन धोरण सन २०१८-१९ बाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शासन मान्य यादीवर असणा-या वृत्तपत्रांना शासनमान्य दराने जाहिराती देणेत येतात. यामध्ये अ, ब, व क वर्ग वृत्तपत्रांचा समावेश आहे. शासनमान्य दराने जाहिरात प्रसिध्द करणाऱ्या खालील वृत्तपत्रांना मनपाच्या यादीवर घेण्यास तसेच रोटेशन ड व ई मधील वृत्तपत्रांना त्यांनी दिलेल्या सवलतीच्या दराने जाहिरात वितरित करण्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र.३४३१ दि.२३/१०/२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर रोटेशनची मागणी करताना पत्रामध्ये निविदा रक्कमेचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात यावा.

**रोटेशन (अ)- एका कामाची निविदा २ कोटी पर्यंत असल्यास-**

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नाव | दर प्रति चौ.सें.मी. |
|---|---|---|
| १ | दै.पुढारी | ४७/- |
| | दै.पुणे जिल्हा सांज समाचार | १२/- |
| | दै.कातिब | ९/- |
| | सा.पिंपरी चिंचवड पवनेचा प्रवाह | ६/- |
| | सा.काय चाललंय | ६/- |
| | | |
| २ | दै.लोकमत | ३६/- |
| | दै.लोकमंथन | ८/- |
| | दै.सिध्दांत समाचार | ८/- |
| | सा.पुरोगामी विचारांची झुंज | ५/- |
| | | |
| ३ | दै.पुण्यनगरी | २५/- |
| | दै.बहुजनरत्न लोकनायक | १३/- |
| | दै.विश्वदर्पण | ८/- |
| | सा.माझी सखी सोबती | ६/- |
| | सा.जनप्रेम | ६/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | दै.लाईफ ३६५ | १९/- |
| | दै.संध्या | १४/- |
| | दै.सांज महानगरी | १३/- |
| | दै.पवना समाचार | १२/- |
| | सा.प्रगत भारत | ७/- |
| | | |
| ५ | दै.नवभारत | १९/- |
| | दै.लोकमान्य सांजवार्ता | १३/- |
| | दै.लोकटाईम्स | १०/- |
| | सा.कात्रजच्या बोगदयातून | ९/- |
| | | |
| ६ | दै.सामना | २४/- |
| | दै.बिझनेस स्टॅंडर्ड | १३/- |
| | दै.महाराष्ट्र निरोप्या | ८/- |
| | दै.जनमंथन | ६/- |
| | सा.क्रांतीप्रकाश | ६/- |
| | | |
| ७ | दै.आज का आनंद | १९/- |
| | दै.दिवस रात्री | ९/- |
| | दै.पिंपरी चिंचवड समाचार | ८/- |
| | दै.विश्वेश्वर | ७/- |
| | सा.सहारा | ८/- |
| | | |
| ८ | दै.लोकसत्ता | २२/- |
| | दै.केसरी | २३/- |
| | दै.बंधुप्रेम | ९/- |
| | दै.दायित्व | ८/- |
| | सा.पुष्पप्रकाश | ७/- |
| | | |
| ९ | दै.सकाळ | ६२/- |
| | दै.संध्यानंद | ३०/- |
| | दै.राष्ट्रतेज | १०/- |
| | दै.नवीन संध्या | ६/- |
| | सा.नव्या समाजाची चाहुल | ७/- |
| | | |

| | | |
|---|---|---|
| १० | दै.महाराष्ट्र टाईम्स | ३८/- |
| | दै.प्रभात | २१/- |
| | दै.भारत डायरी | ८/- |
| | सा.बृहन्‍न वार्ता | ७/- |
| | सा.समाज गर्जना | ६/- |

**रोटेशन (ब) - एका कामाची निविदा २ कोटी पुढील ते ४ कोटी पर्यंत** असल्यास तसेच विकास हस्तांतरण (टीडीआर), महापालिकेची नोकर भरती, मानधनावरील नियुक्ती, विविध विभागातील योजना, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राकडील प्रवेश प्रक्रिया, विविध कोर्सेस तसेच नगररचना विभागाकडील सर्व जाहिराती, जाहीर नोटीस, इत्यादी शासनमान्य दराने खालील रोटेशन मधील वृत्तपत्रास देणेत यावी.

१) दै.लोकमत X दै.केसरी X दै.आज का आनंद X दै. सकाळ

२) दै.पुण्यनगरी X दै.प्रभात X दै.महाराष्ट्र टाईम्स X दै. नवराष्ट्र

३) दै.पुढारी X दै.सामना X दै.लोकसत्ता X दै. नवभारत

**रोटेशन (क) – मा. महापालिका सभेची नोटीस स्थानिक वर्तमानपत्र दै. पवना समाचार मध्ये प्रसिध्द करणेत यावी.**

**रोटेशन (ड) – एकाच कामाची निविदा र.रु. ४ कोटी पुढील ते १० कोटीपर्यंत असल्यास सदर जाहिरात राज्यस्तर व देशस्तरावर** खालील वृत्तपत्रात करारनामा न करता आकारमान निश्चित करुन जाहिराती देवून जाहिरातींचे बिल त्यांच्या सवलतीच्या दरानुसार देण्यात यावे.

१ दै. लोकसता X दै. इंडियन एक्सप्रेस

२ दै. पुण्यनगरी X दै. हिंदुस्तान

३ दै. महाराष्ट्र टाईम्स X दै. नवभारत टाईम्स X दै.टाईम्स ऑफ इंडिया

४ दै. आज का आनंद X दै. न्यू इंडियन एक्स्प्रेस

५ दै. सकाळ X दि हिंदू + बिझनेस लाईन

६ दै. हिंदुस्तान टाईम्स X दै. पुढारी

७ दै. लोकमत X दै. बिझनेस स्टँडर्ड X दै. नवभारत

**रोटेशन (इ) – एकाच कामाची निविदा र.रु. १० कोटीच्या पुढे असल्यास सदर जाहिरात राज्यस्तर व देशस्तरावर** खालील वृत्तपत्रात करारनामा न करता आकारमान निश्चित करुन जाहिराती देवून जाहिरातींचे बिल त्यांच्या सवलतीच्या दरानुसार देण्यात यावे.

१. दै. सकाळ X दै. जागरण

२. दै. लोकमत X दै. भास्कर

३. दै. महाराष्ट्र टाईम्स X दै. नवभारत टाईम्स X दै.टाईम्स ऑफ इंडिया

४. दै. लोकसत्ता X दै. इंडियन एक्सप्रेस

५. दै. पुण्यनगरी X दि हिंदू + बिझनेस लाईन
६. दै. हिंदुस्तान टाईम्स X दै. हिंदुस्तान
७. दै. नवभारत X दै. डीएनए
८. दै. पुढारी X दै. बिझनेस स्टँडर्ड X दै. न्यू इंडियन एक्स्प्रेस

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नांव | पुणे आवृत्ती दर प्रती चौ.सेमी | | राज्यस्तर (महाराष्ट्र) दर प्रती चौ.सेमी | देशस्तर (भारत) दर प्रती चौ.सेमी |
|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय | सवलतीचे | | |
| १ | दै.लोकसत्ता | २२/- | - | १९५०/- | - |
| २ | दै.इंडियन एक्सप्रेस | - | ५५०/- | १८५०/- | २५५०/- |
| ३ | दै.लोकसत्ता + दै.इंडियन एक्सप्रेस | - | ५७२/- | २७००/- | ३१००/- |
| ४ | दै.महाराष्ट्र टाईम्स | ३८/- | - | १३५७/- | - |
| ५ | दै. टाईम्स ऑफ इंडिया | | ५९७/- | २७२३/- | ४८५१/- |
| ६ | दै.महाराष्ट्र टाईम्स + दै. टाईम्स ऑफ इंडिया + नवभारत टाईम्स | | ६३५/- | ३३१९/- (महाराष्ट्र+गोवा) | ५६६२/- |
| ७ | दै. बिझनेस स्टँडर्ड | १३/- | - | ४५०/- | ११००/- |
| ८ | दै. हिंदुस्तान टाईम्स | | ४००/- | १९००/- | ४२००/- |
| ९ | दै. हिंदुस्तान | - | - | - | ४०००/- |
| १० | दै. दि हिंदू + बिझनेस लाईन | - | - | २७५/- | ३६००/- |
| ११ | दै. लोकमत | ३६/- | - | १८४०/- | - |
| १२ | दै. सकाळ | ६२/- | - | १९००/- | - |
| १३ | दै. पुढारी | ४७/- | - | १५००/- | - |
| १४ | दै. पुण्यनगरी | २५/- | - | १०००/- | - |
| १५ | दै.दि न्यू इंडियन एक्स्प्रेस | - | - | - | २५००/- |
| १६ | दै.जागरण | - | - | - | ९५००/- |
| १७ | दै.आज का आनंद | १९/- | - | ३००/- | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | दै. नवभारत | १९/- | - | १०००/- | - |
| १९ | दै. भास्कर | - | - | - | ९३००/- |
| २० | दै. डीएनए | - | - | - | २७१/- |

**धोरणात्मक बाबी व अटी - शर्ती**

**१)** मनपाच्या जाहिरातीसाठी जो क्रमांक चालु असेल ते रोटेशन स्विकारावे लागेल.

**२)** माहिती व जनसंपर्क विभागाकडून जाहिरात रोटेशन घेतल्या शिवाय परस्पर वृत्तपत्रांना जाहिराती देण्यात येवू नयेत.

**३)** माहिती व जनसंपर्क विभागाकडून रोटेशन प्राप्त झालेनंतर, सदरची जाहिरात विनाविलंब संबंधित वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दिस देण्यात यावी. तसेच संबंधित विभागाने निविदा किंवा इतर जाहिरात यांचे मुख्य शिर्षक उदा. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हा फॉन्ट साईज १४, स्थापत्य विभाग हा फॉन्ट साईज ११ तर निविदा सुचना क्र. १/२०१८-१९ हा फॉन्ट साईज ९.५ तसेच इतर मजकुराचा उदा. निविदा अटी शर्ती व कामाची नावे ९.५ या फॉन्ट साईज मध्ये छापणेस तसेच इंग्रजी वृत्तपत्रे यांना अनुक्रमे १४,११,८.५ व ८.५ या फ़ॉन्ट साईझ प्रमाणे जाहिरात छापणेस वृत्तपत्रांना कळविण्यात यावे.

**४)** माहिती व जनसंपर्क विभागाकडून प्राप्त झालेल्या रोटेशननुसार ज्या वृत्तपत्रांने कमीत कमी आकारमानात जाहिरात प्रसिध्द केली असेल त्या वृत्तपत्राच्या आकारमानानुसार इतर वृत्तपत्रांना बिले अदा करण्यात यावीत.

**५)** रोटेशन 'अ' नुसार निविदेमध्ये एकापेक्षा जास्त कामे ही र.रू. २ कोटीपर्यंत असल्यास तसेच रोटेशन 'ब' नुसार एक किंवा जास्त कामे २ कोटीपेक्षा जास्त परंतु ४ कोटीपर्यंत असल्यास त्यासाठी एकच रोटेशन न घेता रोटेशन 'अ' व रोटेशन 'ब' साठी स्वतंत्र रोटेशन घेण्यात यावे.

**६)** म.न.पा. रोटेशन यादीवरील दैनिकांनी विहित मुदतीनंतर कमाल २ दिवसांत जाहिरात प्रसिद्ध करावी. तसेच प्रत्येक साप्ताहिकांचा छपाईचा दिवस हा वेगवेगळा असल्यास विहित मुदतीनंतरही ४ दिवसांनी सदरची जाहिरात योग्य प्रकारे छापली असल्यास जाहिरात प्रसिध्दिचे बिल अदायगीस पात्र राहिल.

**७)** संबंधित विभागांनी जाहिरात मसूदा सायं. ४.०० वा पर्यंत संबंधित वृत्तपत्रांना समक्ष अथवा ई-मेलद्वारे पाठवण्यात येऊन भ्रमणध्वनीद्वारे जाहिरात मिळाल्याची खातरजमा करावी.

८) रोटेशन प्राप्तीनंतर संबंधित विभागाने वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्धीसाठी न दिल्यास त्याची कारणे मा. आयुक्त अथवा मा. अतिरिक्त आयुक्त यांचेकडे त्वरित सादर करावी व मान्यतेनंतर त्याची एक प्रत माहिती व जनसंपर्क विभागाकडे सादर करावी.

९) जाहिरातीचे बील अदायगीकरिता लेखा विभागाकडे पाठविल्यानंतर संबंधित वृत्तपत्राच्या प्रतिनिधींना भ्रमणध्वनीव्दारे कळविण्यात यावे.

१०) जाहिरात प्रसिध्द झालेपासून आठ दिवसात वृत्तपत्रांनी संबंधित विभागाकडे जाहिरात बिले सादर करावीत तसेच संबंधित विभागांनी एका महिन्याच्या आत बिले अदा करण्याची कार्यवाही करावी. संबंधित वृत्तपत्रांनी मुदतीमध्ये जाहिरात बिले सादर न केल्यास प्राप्त वृत्तपत्रांची जाहिरात बिले अदा करण्यात यावीत.

११) जाहिरात प्रसिध्दीबाबतचा पत्रव्यवहार हा संबंधित वृत्तपत्राच्या जाहिरात व्यवस्थापक यांच्या नावे करावा. महापालिकेने दिलेल्या विहित मुदतीत एखाद्या वृत्तपत्राने जाहिरात प्रसिध्द न केल्यास/अपुर्ण अथवा चुकीची तसेच अस्पष्ट/वाचण्यायोग्य नसलेली जाहिरात छापल्यास अशा जाहिरातीच्या प्रसिध्दिचे बिल अदायगीस पात्र राहणार नाही.

१२) महापालिकेचे बोधचिन्ह व जाहिरात क्रमांक जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्याच्या सूचना संबंधित वृत्तपत्रांना देण्यात याव्यात. मनपाचे बोधचिन्ह/जाहिरात क्रमांक /जाहिरात मसुद्यातील एखादा शब्द अथवा एखादी ओळ वृत्तपत्राने जाहिरातीत प्रसिध्द न केल्यास दंड म्हणून र. रू. १००/- (अक्षरी र. रू. शंभर फक्त) संबंधित वृत्तपत्राच्या जाहिरात बिलामधून वजा करण्यात यावेत. तसा दाखला बिलामध्ये देण्यात यावा. तसेच लेखापरिक्षण आक्षेपामध्ये काही त्रुटी/ आक्षेप वसुली आढळून आल्यास संबंधित विभागप्रमुखांमार्फत त्वरित वसुली करण्यात यावी. व तसा पुर्तता अहवाल माहिती व जनसंपर्क विभागाकडे पाठवावा.

१३) सदरचे दर आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू होतील.

१४) रोटेशन धोरण सन २०१७-१८ मध्ये दै. सकाळ, दै. लोकसता व दै. महाराष्ट्र टाईम्स यांचे नमूद केलेले शासकीय दर दि. ०१/०४/२०१८ पासून लागू होतील.

१५) मनपाच्या सर्व विभागा/ कार्यालयाकडून माहिती व जनसंपर्क विभागाकडे रोटेशन मिळणेकामी पत्र दिले जाते. त्यासोबत कार्यालयीन मंजूर प्रस्ताव, प्रसिध्दिसाठी द्यावयाचा मसुदा/ जाहिरात / निविदा कामे अद्ययावत माहितीसह देण्यात यावी. सदरचे पत्र जाहिरात प्रसिद्धी दिनांकापुर्वी किमान ३ दिवस अगोदर माहिती व जनसंपर्क विभागाकडे देणे आवश्यक आहे.

१६) नव्याने जाहिराती देणे/ मान्य धोरणात काही अडचणी निर्माण झाल्यास अगर फेरबदल करणे आवश्यक असल्यास याबाबत संपुर्ण निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल.

१७) संबंधित विभागाने वृत्तपत्रांची जाहिरात बिले नियमानुसार तयार करून माहिती व जनसंपर्क विभागाकडून तरतुद टाकून बिले अदायगीची पुढील कार्यवाही करावी. तसेच जाहिरातीचे बिल अदायगीकरिता लेखा विभागाकडे पाठविल्यानंतर संबंधित वृत्तपत्राच्या प्रतिनिधींना भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात यावे.

१८) सदरच्या रोटेशन धोरण परिपत्रकाची अंमलबजावणी आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून करण्यात यावी. तसेच पुढील वर्षाचे रोटेशन निश्चित होईपर्यंत या परिपत्रकाचा अवलंब करावा.

सही/-

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - १८**